
खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : १२१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.१४ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# महाराष्ट्राचे दोन तुकडे होणार? रामदास आठवले यांची वेगळ्या विदर्भाची मागणी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, नागपूर :** केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी वेगळ्या विदर्भाची मागणी केली आहे. भाजपचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं आहे की, स्वतंत्र विदर्भाची मागणी भाजपची आहे. पण भाजपच्या मागणी बरोबरच रिपब्लिकन पक्षाचीदेखील ही सगळ्यात अगोदर मागणी होती. रिपब्लिक पक्षानेदेखील अनेकदा वेगळ्या विदर्भाची मागणी केलेली आहे. त्यासाठी परिषदा घेतल्या आहेत. आंदोलने केले आहेत. स्वतंत्र विदर्भ होणं अत्यंत आवश्यक आहे. कारण १ मे १९६० ला स्वतंत्र महाराष्ट्राची स्थापना झाला. विदर्भाला जेवढा आर्थिक न्याय मिळाला पाहिजे तेवढा न्याय मिळाला नाही. त्यामुळे स्वतंत्र विदर्भाची मागणी होत आहे, असं रामदास आठवले म्हणाले.

वेगळ्या विदर्भाच्या मागणीच्या आंदोलनाची तिव्रता दिसत नाही. ज्याप्रमाणे तेलंगणा आणि आंध्रामध्ये जे झालं, तेलंगणा वेगळं करण्यासाठी चंद्रशेखर राव यांनी मोठं आंदोलन केलं होतं. तसं आंदोलन विदर्भात दिसत नाही. आमची वेगळा विदर्भाची मागणी आहेच. माझ्या पक्षाची स्वतंत्र विदर्भाची मागणी आहे, अशी भूमिका रामदास आठवले यांनी मांडली.

**आठवलेंचा ठाकरे बंधूंवर काव्यात्मक हल्ला...**

मी आज विधीमंडळाचा मारलाय फेरफटका, कारण मला द्यायचा आहे ठाकरेबंधूंना झटका, असा काव्यात्म क हल्ला केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर शनिवारी विधानभवन परिसरात प्रसारमाध्यमांशी बोलताना चढविला. केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले हे त्यांच्या विनोदी कवितांसाठी प्रसिद्ध आहेत. संसदेचे अधिवेशन असो वा सार्वजनिक कार्यक्रम असो. आठवले कायम त्यांच्या विनोदी शैलीतील काव्याने टीकाटिप्पणी करत असतात. अशात शनिवारी त्यांनी विधीमंडळाला भेट दिली. यावेळी त्यांनी ठाकरे बंधूंवर निशाणा साधला.

आगामी महानगरपालिकेच्या निवडणुका, महायुती म्हणून एकत्र लढण्याचा निर्णय तसेच नागपूरातील हिवाळी अधिवेशनाचे महत्त्व आदी मुद्यांवर त्यांनी भाष्य केले. नागपूर ही आपली उपराजधानी आहे. येथे होणारे अधिवेशन नागपूर आणि विदर्भाच्या विकासावर चर्चा करण्यासाठी असते, असं रामदास आठवले म्हणाले. यावेळी त्यांनी महायुतीवरही भाष्य केलं. आठवलेंचा महायुतीत महापालिका निवडणुका लढण्याचा निर्धार

माझा रिपब्लिकन पक्ष हा महायुतीमध्ये आहे. आम्ही येत्या महानगरपालिका निवडणुकांमध्ये एकत्र लढण्याचा निर्णय घेतला आहे.



नगरपरिषदांच्या निवडणुकांमध्ये आम्ही एकमेकांविरुद्ध लढलो, तो आमचा गनिमी कावा होता. मात्र, महानगपालिकेच्या निवडणुकांमध्ये आम्ही एकत्र लढणार आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यात चर्चा झाली आहे. त्यानुसार, रिपब्लिकन पक्षाला सोबत घेऊन १९ महानगरपालिकांच्या निवडणुका आम्ही सोबत लढणार असून त्यामध्ये आम्हाला आमचा योग्य वाटा मिळायला हवा, अशी भूमिका रामदास आठवले यांनी मांडली.

रिपब्लिकन पक्षाची ताकद अनेक शहरांमध्ये आहे. त्यादृष्टीने मी बोलणार आहे. आम्हाला मुंबईमध्ये १५ ते १६ आणि नागपूरात ७ ते ८ जागा मिळाव्यात, अशी मागणी आहे, असं रामदास आठवले म्हणाले. राज्य विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील विरोधी पक्षनेतेपद रिक्त असल्याच्या मुद्यावरही त्यांनी भााष्य केलं. विरोधी पक्षनेता हा संख्याबळाच्या आधारावर ठरत असतो. सध्या महाविकास आघाडीकडे ते संख्याबळ नाही. त्यामुळे विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय अध्यक्षांनी नियमानुरूप घ्यायला हवा. मात्र, सभागृहात विरोधी पक्षनेता असायलाच हवा, असं स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केलं.

**'म्हणून आम्ही त्यांच्यावर केलाय हल्ला'**

आठवले यांनी यावेळी विरोधकांवरही काव्यात्मक हल्ला चढविला. विरोधकांनी वेगळ्याच ठिकाणी मारलाय डल्ला, म्हणून आम्ही त्यांच्यावर केलाय हल्ला, असे ते विरोधकांवर बोलताना म्हणाले.

## विंचूर परिसर थंडीने गारठला..

### पारा ५.७ अंशांवर; शहरात शेकोट्या पेटवून थंडीपासून बचाव



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१३, विंचूर (नाशिक) :** नोव्हेंबरच्या दुसऱ्या पंधरवड्यापासून सुरू झालेल्या थंडीचा जोर दिवसागणिक वाढत असून, त्यामुळे संपूर्ण तालुका थंडीने गारठू लागला आहे.

थंडीपासून बचाव करण्यासाठी विंचूर शहरात व परिसरात नागरिकांनी शेकोट्या पेटवल्याचे चित्र पाहायला मिळाले. लहान मुले, वयोवृद्ध नागरिक शेकोट्यांच्या भोवती ऊब घेताना दिसत असून, थंडीचा कडाका सर्वसामान्य जनजीवनावर परिणाम करत आहे. वाढत्या थंडीमुळे स्वेटर, मफलर, शाल यांसारख्या उबदार कपड्यांना बाजारपेठेत चांगली मागणी वाढली आहे.

हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार येत्या आठवड्यातही थंडीचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे तापमानात आणखी घट झाल्याचे जाणवत आहे. या थंडीचा सर्वाधिक फटका द्राक्ष उत्पादकांना बसत असून,अनेक ठिकाणी द्राक्षबागांमध्ये चिपाटे पेटवून उष्णता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.थंडीमुळे द्राक्षवेलींची अन्नद्रव्य तयार करण्याची क्षमता कमी झाली आहे. तापमान आणखी घसरल्यास द्राक्षमण्यांना तडे जाणे, पाने करपणे यांसारखे नुकसान होण्याची शक्यता कृषी तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

सध्याची थंडी गहू, हरभरा व कांदा पिकांसाठी काही प्रमाणात पोषक ठरत असली, तरी अतिशय थंडी वाढल्यास कांदापात करपणे, गहू पिक आडवे पडणे यांसारख्या समस्या उद्भवू शकतात.

दरवर्षी डिसेंबर अखेर व जानेवारीच्या सुरुवातीस थंडीचा कडाका वाढतो; मात्र यंदा नोव्हेंबरमध्येच थंडीने आपले तीव्र रूप दाखवले आहे. हा थंडीचा माहोल मार्चपर्यंत कायम राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सध्या तालुक्यात कांदा लागवड व इतर शेती मशागतीची कामे सुरू असून, वाढत्या थंडीचा त्यावरही परिणाम होताना दिसत आहे.

## सिडकोच्या घरांच्या दर्जाबाबत चौकशी करणार

**अक्षराज : जे. क पोळ**

**दि.१३, मुंबई :** पनवेल, नवी मुंबई परिसरात सिडकोमार्फत बांधण्यात येणाऱ्या घरांचा दर्जा चांगला आहे. तरीही या घरांच्या दर्जाबाबत सदस्यांनी केलेली सूचना तसेच या बाबत तक्रारी प्राप्त झाल्यास त्याची चौकशी केली जाईल, असे नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधान परिषदेत सांगितले.

सदस्य विक्रांत पाटील यांनी यासंदर्भात विधान परिषदेत नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित केली होती.

राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या, सिडकोकडून विक्री केलेल्या घरांसाठी दोन वर्षांसाठी देखभाल दुरुस्ती शुल्क घेतले जाते. या निधीतून इमारत देखभाल, पाणी, वीज, लिफ्टची देखभाल दुरुस्ती केली जाते. सामायिक जागेतील वीज व पाणी बिल, तसेच सुरक्षा खर्चासाठी घेतलेली आगाऊ रक्कम सोसायटी स्थापन झाल्यानंतर त्या सोसायटीकडे वर्ग केली जाते. तसेच ५१ टक्के रहिवासी तयार झाल्यास सोसायटी नोंदणी करून देण्याचा सिडकोचा प्रयत्न असून त्यानंतर देखभाल दुरुस्तीची जबाबदारी संबंधित सोसायटीकडे दिली जाते, असे राज्यमंत्री मिसाळ यांनी सांगितले.

राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या, सिडकोच्या घरांच्या प्रश्नासंदर्भात सर्व संबधित सदस्यांसमवेत बैठक घेतली जाईल. तसेच या घरांच्या मालमत्ता कराबाबतचा विषय न्यायालयात प्रलंबित असून न्यायालयाच्या निर्णयानुसार कार्यवाही केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

## आशियातील सर्वात मोठे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर महाराष्ट्रात उभारण्यात येणार

### एमएमआरडीए आणि ब्रुकफिल्ड कंपनी यांच्या संयुक्त नेतृत्वात प्रकल्प उभारणार

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१३, मुंबई :** महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील प्रतिभा, पायाभूत सुविधा आणि व्यवसाय-अनुकूल वातावरण या तीन घटकांमुळे महाराष्ट्र ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरसाठी अग्रगण्य ठरत आहे. यावर्षी जाहीर केलेले नवीन ऋछउ धोरण राज्यात उच्च मूल्याच्या, कौशल्याधारित रोजगारनिर्मितीस प्रोत्साहन देईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले.

ब्रुकफिल्ड कंपनीने मुंबईतील पवई येथे ६ एकर जागेवर २० लाख चौरस फूट भाडेतत्वावरील बांधकाम असलेला भव्य प्रकल्प उभारण्याची घोषणा केली आहे. या अंतर्गत बहुराष्ट्रीय बँकेचे आशियातील सर्वात मोठे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर स्थापन केले जाणार आहे. हा करार २० वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या मोठ्या प्रकल्पांमुळे महाराष्ट्राच्या प्रगतीबाबत जागतिक स्तरावर विश्वास दृढ झाला आहे. आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या भविष्यातील गरजा पूर्ण करण्याबरोबरच, स्थिर आणि सक्षम वातावरण पुरवण्यास राज्य शासन तत्पर आहे. सदर प्रकल्प २०२९ पर्यंत पूर्ण होणार असून, यामध्ये १ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक गुंतवणूक अपेक्षित आहे तसेच ३०,००० हून अधिक रोजगारनिर्मिती होणार आहे. हा प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व ब्रुकफिल्ड यांच्या नेतृत्वाखाली भागीदार बी.एस. शर्मा यांच्या सहकार्याने राबविण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री म्हणाले की, ही उभारणी महाराष्ट्रातील गुंतवणूकदार-अनुकूल वातावरणाबाबत जागतिक कंपन्यांचा वाढता विश्वास अधोरेखित करणारी आहे. प्रकल्पासाठी १०० टक्के हरित उर्जेचा वापर करण्याचे उद्दिष्ट असून इमारत बाजारातील सर्वोत्तम शाश्वत बांधकाम मानकांनुसार उभारली जाणार आहे. यामुळे मुंबईचे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर हब म्हणूनचे स्थान आणखी मजबूत होणार आहे. २०२४ मध्ये ब्रुकफिल्डने पुण्यात एका मोठ्या



वित्तीय सेवा कंपनीसाठी 'बिल्ड-टू-सूट' टॉवर उभारला होता. याच वर्षी MMRDA सोबत १२ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार करण्यात आला. जून २०२५ मध्ये कंपनीने बांद्रा-कुर्ला संकुलात २.१ एकर जागा खरेदी केली आहे. ब्रुकफिल्डचे वरिष्ठ गुंतवणूक अधिकारी अंकुर गुप्ता म्हणाले, आशिया खंडातील कार्यालय विकास क्षेत्रात नवा मापदंड ठरेल असा हा आयकॉनिक प्रकल्प आम्ही उभारत आहोत. मुंबईत करण्यात आलेली गुंतवणूक आता ४ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक झाली आहे. उच्च दर्जाची, शाश्वत आणि आधुनिक कार्यस्थळे निर्माण करण्यासाठी ब्रुकफिल्ड कटिबद्ध आहे. ब्रुकफिल्ड ही भारतातील सर्वात मोठ्या कार्यालयीन मालक आणि ऑपरेटर कंपन्यांपैकी एक असून देशातील सात शहरांमध्ये सुमारे ५५ दशलक्ष चौरस फूट क्षेत्राचे व्यवस्थापन करते. उच्च दर्जाच्या, ग्रेड-अ प्रकल्पांची विकास व संचालन क्षमता कंपनीने सातत्याने सिद्ध केली आहे. पवईतील प्रस्तावित प्रकल्पाला उत्कृष्ट कनेक्टिव्हिटी, सामाजिक सुविधा व मोठ्या प्रमाणातील कुशल मनुष्यबळाचा लाभ मिळणार आहे.

## एकनाथ शिंदेंची मोठी घोषणा, सिडकोच्या घरांच्या किंमती कमी केल्या

### अनेकांचं घर घेण्याचं स्वप्न पूर्ण होणार...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, नागपूर :** मुंबई किंवा नवी मुंबईत आपलं हक्काचं घर खरेदी करावं, अशी अनेकांची इच्छा असते. ही इच्छा अनेकांची पूर्ण होणार आहे. कारण नवी मुंबईत सिडकोच्या घरांच्या किंमतीत १० टक्क्यांनी कपात करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री एकनात शिंदे यांनी याबाबत घोषणा केली आहे. सिडकोंच्या घरांच्या किंमतीत घसरण झाल्याने नवी मुंबईत घर घेऊ इच्छिणाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. नवी मुंबई हे शहर आधीपासूनच सुसज्ज आहे. तिथे स्वच्छता चांगली राखली जाते. तसेच हे शहर दाटीवाटीचं नाही. इथे सगळ्या सुविधा आहेत. तसेच इथे आंतरराष्ट्रीय विमानतळ सुद्धा सुरु झालं आहे. त्यामुळे नागरिकांना हव्या असणाऱ्या सगळ्या सुविधा या शहरात आहे. त्यामुळे घर घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी इथे चांगला पर्याय आहे. अत्यल्प आणि मध्यम





उत्पन्न गटासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे. नवी मुंबईतील सिडकोच्या वेगवेगळ्या प्रवर्गातील घरांसाठी सिडकोने जे दर निश्चित केले होते त्यामध्ये थेट १० टक्के कपात करण्यात येत असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत निवेदनाद्वारे केली. या निर्णयामुळे आता ही घरे पूर्वीपेक्षा स्वस्त दरात उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे नवी मुंबई परिसरात घर घेण्याचे सर्वसामान्यांचे स्वप्न आता अधिक सुकर होणार आहे. सिडकोतर्फे नवी मुंबईतील खारघर, वाशी, खारकोपर, तळोजा, उलवे, कळंबोली, कामोठे आणि पनवेल या परिसरात तब्बल १७ हजार घरे बांधण्यात आली आहेत. या घरांसाठीची लॉटरी प्रक्रिया येत्या दोन महिन्यांत पूर्ण केली जाणार आहे.

त्यापूर्वी सर्वसामान्यांना दिलासा देण्यासाठी घरांच्या किंमती कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. इडब्ल्यूएस आणि एलआयजी या प्रवर्गातील घरांच्या किमती १० टक्के कमी होतील, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधान परिषदेत निवेदन करताना दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सर्वांसाठी घरे या संकल्पनेला बळ देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात अधिकृत आणि चांगल्या दर्जाची घरे मिळणे शक्य होणार आहेत, अशी देखील माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभागृहात दिली.

## संपादकीय

### महाराष्ट्र वाल्मीकी

मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ ग. दि. मा. यांचा आज स्मृतिदिन. १ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काहीकाळ लेखनिक म्हणून काम केले त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि स खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले. हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला. या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले.

या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिका काही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन ह्या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत. गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली.

त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. लोकांना गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही पदवी दिली. ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली. दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहुन अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला. १९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याची त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील.

बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# माय एक आणा दे,बंद होणार...?

## महाराष्ट्रात भीक मागण्यावर प्रतिबंध विधेयक मंजूर

भुकेल्याला अन्न, तहानलेल्याला पाणी, उघड्यानागड्यांना वस्त्र, बेघरांना आसरा हेच पुण्यकर्म आहे,' अशी संत गाडगे महाराज यांची शिकवण. प्राचीन काळापासून भारतात भिक्षा मागणे हे आजच्यासारखे तुच्छ मानले जात नव्हते, ती धार्मिक आणि आध्यात्मिक जीवनाशी निगडित एक प्रथा म्हणून स्वीकारली गेली होती. वैदिक काळात आणि त्यानंतर बौद्ध आणि जैन धर्मांच्या आचरणानुसार, तपस्वी आणि भिक्षू यांना भिक्षा देण्यासाठी गृहस्थांनी उदार भावनेने दिलेले दान म्हणजेच भिक्षा हे पुण्य मानले जात असे. जनतेच्या मनात बिंबलेल्या पुण्यकर्माच्या संस्कारामुळेच आजही रस्त्यातून जाताना कुणी मदतीसाठी हात पुढे केला, तर त्याला पैसे किंवा वस्तुरूपात मदत करण्याची भावना असते.



मात्र, याच शुद्ध भावनेचा गैरफायदा करून भिक्षेचा धंदा करणाऱ्या टोळ्या महाराष्ट्रातच नव्हे; देशातील अनेक राज्यात कार्यरत झाल्या आहेत. हा गैरप्रकार रोखण्यासाठी देशातील २२ राज्यांमध्ये भिक्षेकरी विरोधी कायदा अस्तित्वात आहे. भारतात आजही भीक मागणे हा सामाजिक गुन्हा मानला जात नाही. तथापि, बॉम्बे प्रिव्हेंशन ऑफ बेगिंग ॲक्ट, १९५९ आणि इतर राज्यांमधील तत्सम कायदे स्थानिक प्राधिकरणांना सार्वजनिक ठिकाणी भीक मागताना आढळलेल्या व्यक्तींना ताब्यात घेण्याची आणि त्यांचे पुनर्वसन करण्याची परवानगी देतात. भारतीय दंड संहितेनुसार भीक मागण्याच्या उद्देशाने अल्पवयीन मुलाचे अपहरण करणे किंवा त्यांना अपंग करणे हा गुन्हा आहे. भिक्षा मागणे म्हणजे काय आणि अल्पवयीन म्हणून कोण पात्र आहे हे देखील या कलमांनुसार परिभाषित केले आहे. भीक मागण्यासाठी मुलाला कामावर ठेवणे किवा त्याचा वापर करणे हे बेकायदेशीर आहे. या कायद्यामुळे पोलिसांनी भीक मागायला लावणाऱ्या अनेक टोळ्यांचा पर्दाफाश केला आहे. भिक्षेकरी विरोधी कायद्यामुळेच आतापर्यंत अनाथ मुलांचे झालेले शोषण रोखता आले आणि मुलांवरील अत्याचारापासून त्यांना संरक्षण मिळाले, ही बाब नव्याने सांगण्याची गरज नाही.

राज्यात 'भीक' या शब्दावरून पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. महाराष्ट्रात भीक मागण्यावर प्रतिबंध घालणारे विधेयक बुधवारी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत मंजूर झाले. हे विधेयक सामाजिक सुरक्षा आणि सार्वजनिक व्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे, असा दावा सरकारच्यावतीने करण्यात आला असला, तरीही सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या आमदारांनी विधेयकांतील 'महारोगी' या शब्दावर आक्षेप नोंदवला. विधेयकाबाबत सदस्यांना दिलेल्या माहिती पुस्तिकेतील स्पष्टीकरण अपुरे आणि गोंधळात टाकणारे आहे, अशी तक्रार सभापती नीलम गो-हे यांच्याकडे नोंदविण्यात आली. त्यामुळे विधेयकातील त्रुटी आणि सदस्यांच्या सूचनांवर चर्चा करण्यासाठी शनिवारी सभापतींच्या दालनात याबाबत विशेष बैठक बोलावली आहे. या तांत्रिक मुद्द्यांवरील चर्चेनंतर विधेयकांचे कायद्यात रूपांतर होईल, यात शंका नाही. देशपातळीवर विचार केल्यास, भीक मागण्याला गुन्हा ठरवणारा कोणताही केंद्रीय कायदा नाही. परंतु, काही राज्यांनी भीक मागण्यावर बंदी घालणारे कायदे केले आहेत. १९५९ च्या मुंबई भीक प्रतिबंधक कायद्यामुळे पोलिसांना भिकाऱ्यांना अटक करण्याचे अधिकार दिले गेले आहेत. पहिल्या गुन्ह्यासाठी ३ वर्षांपर्यंत आणि दुसऱ्या गुन्ह्यासाठी १० वर्षांपर्यंत तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे. भीक मागणे बेकायदेशीर कृत्य म्हणून घोषित करत, नवी दिल्ली, गुजरातसह अन्य काही राज्यांनीही हाच कायदा स्वीकारला. मात्र, राजस्थानने एक अनोखा कायदा केला. भिकाऱ्यांना भीक मागण्याऐवजी त्यांचे पुनर्वसन करण्यास प्रोत्साहन देत आहे. २०१२ साली लागू करण्यात आलेल्या कायद्याद्वारे भिकाऱ्यांना शिक्षा करून तुरुंगात टाकण्याऐवजी त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा राजस्थान सरकारचा उद्देश होता. तो किती सफल झाला हा वेगळा विषय ठरतो.

राज्याला भिकारीमुक्त करण्यासाठी भिकाऱ्यांना अटक करण्याची मोहीम अनेक वर्षे राबवली जाते. 'महाराष्ट्र भिकारी प्रतिबंधक कायदा, १९६०' अंतर्गत भिकाऱ्यांवरही कायदेशीर कारवाई केली जाते. या अटक कारवाईत ८० टक्के भिकारी त्यांच्या असहाय्यतेमुळे नव्हे तर व्यवसाय म्हणून भिक्षा मागत आहेत, अशी धक्कादायक बाब पुढे आली आहे. मुंबईसारख्या शहरात भिकाऱ्यांच्या अनेक टोळ्या सक्रिय आहेत, हे पोलिसांनी केलेल्या विविध छाप्यांमध्ये उघड झाले आहे. महिला आणि मुलांचा वापर भीक मागण्यासाठी केला जातो. लहान मुले आणि महिलांच्या मानवी तस्करीसह अनेक सेक्स रॅकेट भीक मागण्याच्या धंद्यात आहेत. त्यामुळे या व्यवसायाला गुन्हेगारी पार्श्वभूमीची किनार आहे. म्हणूनच या समस्येचे गंभीर स्वरूप लक्षात घेऊन राज्य सरकारकडून हा कायदा कठोर केला जात असेल, तर त्याचे स्वागतच करायला हवे. दुसऱ्या बाजूने विचार केला, तर भिक्षा मागणे ही एक सामाजिक आणि आर्थिक समस्या आहे; जी समाजात खोलवर रुजलेली आहे. धर्माच्या परिघावर असलेले अनेक समाजघटकांची उपजीविका ही भिक्षेवर आधारित आहे. त्यात पोतराज, डोंबारी, देवदेवतांच्या नावाने घरोघरी भिक्षा मागणारे सुद्धा आलेच. त्यात या कायद्यामुळे अडचण होणार नाही ना? ही बाबही तपासून पाहावी लागणार आहे. मुंबईसारख्या शहरात ग्रामीण भागातून मुली, स्त्रिया रेल्वे स्थानक परिसरात पोट भरण्यासाठी भीक मागताना दिसतात. त्यामुळे, रोजगाराचा अभाव, शिक्षण, गरिबी आणि इतर विविध कारणे त्यात लपलेली आहेत. याचाही विचार करण्याची गरज आहे. 'भिक्षेकरी कायदा' नावाने विधिमंडळात मंजूर झालेला एक जुना कायदा आहे, जो महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंध अधिनियम, १९५९ म्हणून ओळखला जातो; या कायद्यामुळे भीक मागणे हा गुन्हा ठरतो आणि भिकाऱ्यांच्या पुनर्वसनासाठी शासनाला अधिकार मिळतात. त्यांना ताब्यात घेणे, प्रशिक्षण देणे व रोजगार देणे यांसारख्या तरतुदींचा समावेश त्यात आहे. हा देशातील पहिला भिक्षा प्रतिबंधक कायदा असून भिकारी आणि भिक्षा देणारे दोघेही यात गुन्हेगार ठरतात. राज्य विधिमंडळाने मंजूर केलेल्या सुधारित कायद्यामुळे भीक मागण्याच्या नावाखाली टोळ्या चालविणाऱ्यांना लगाम बसला आणि देशाचं उभं राहणारं 'दरिद्री' हे चित्र रोखलं गेलं तरी खूप झालं.

**- ह.भ.प. शिवाजी विठ्ठल चौगुले**
**मु.पो. मासा बेलेवाडी**
**कागल-कोल्हापूर**

### अनौरस..



उग्र स्वरूप समस्या
अनौरस ती बालक
अंधारात लुप्त झाले
बेजबाबदार पालक

छत्र छाया हरवलेली
निस्तेज होई लोलक
किड्या मुंग्या जीणी
पहावी त्यांची झलक

अनैतिक संबंधातून
घडली अक्षम्य चूक
बळी मात्र मुलेजाती
निशाणा लागेअचूक

विसरले कसे विरोध
शरीर सुखाची भूक
आपला पोटचागोळा
आईही कशी ती मूक

खंडीभर मुलां जन्म
मिळाले कसले सुख
हवाला द्या वरच्यांचा
कुणी न जाईविन्मुख

फेकून दिले अनौरस
मोठे होती आपसूक
अनाथबालक समस्या
तसेचं राहिले ते दुःख

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# छत्रपती शिवरायांच्या पराक्रमाचा दिल्लीत होणार जागर !

असे म्हणतात, 'जी पिढी आपला इतिहास विसरते ती रसातळाला जाते'. कोणत्याही देशाचा इतिहास केवळ शालेय पाठयपुस्तकांची पाने भरण्यासाठी नसतो तर त्या इतिहासामागे कित्येक पिढ्यांचा जाज्वल्य पराक्रम आणि राष्ट्रप्रतीचा अपरिमित त्याग लपलेला असतो. आपल्या राष्ट्राच्या रक्षणासाठी प्राणार्पण करण्याची सिद्धता असणारे आणि त्यासाठी घरादाराचा त्याग करणारेच इतिहास घडवतात. या इतिहासाचे पारायण करून पुढच्या पिढीने आपल्या राष्ट्राच्या आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी पुढे यायचे असते. आपले परमभाग्य म्हणून आपण परमपवित्र भारतभूमीत जन्माला आलो आहोत ज्या भूमीने मागील कित्येक पिढ्या तिच्या रक्षणासाठी हसत हसत बलीवेदीवर चढताना पाहिल्या आहेत. ही भूमी महापराक्रमी योध्यांची आहे ज्यांनी बलाढ्य शत्रुलाही नामोहरम करून याच भूमीत गाडले आहे. ही भूमी क्रांतिवीरांची आहे ज्यांनी भारतमातेला पारतंत्र्याच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी घरादारावर तुळशीपत्र ठेवले. ही भूमी त्या रणरागिणींची आहे ज्यांनी 'अबला' ही ओळख पुसून प्रसंगी लाखोंच्या सैन्याचे नेतृत्व केले आहे. रणचंडीच्या रूपाने शत्रूवर त्या तुटून पडल्या आहेत. अशा या जाज्वल्य इतिहासाचा आजच्या पिढीला विसर पडत चालला आहे. मोबाईल आणि इंटरनेटच्या जाळात अडकलेला आजचा तरुण सदासर्वकाळ मान वाकवून मोबाईल गेम्स खेळत, रिल्स आणि वेब सिरीज पाहत तासनतास घालवताना दिसत आहे. देशासाठी प्राणार्पण करणारे क्रांतिकारक आणि देशभक्त नव्हे तर तोकडे कपडे घालून वावरणाऱ्या नट्या आणि ऑनस्क्रीन मद्य रिचवणारे, गुंडगिरी करणारे नट आजच्या पिढीचे रोल मॉडेल्स बनू लागले आहेत. शालेय शिक्षणात नैतिक मूल्यांचे आणि धार्मिक शिक्षण दिले जात नसल्याने पाश्चिमात्य देशांत साजरे केले जाणारे डेज हेच आजच्या पिढीचे सण उत्सव बनू लागले आहेत. इंग्रज भारतातून जाऊन ७८ वर्षे उलटली मात्र त्यांनी घालून दिलेली शिक्षण पद्धती आपण आजही त्यागलेली नसल्याने आपल्यावरही पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव पडलेला आहे. आनंदाचे क्षण आपण गोडधोड करून नव्हे तर केक कापून साजरे करू लागलो आहोत, आपल्या दुकानांचे आणि आस्थापनांचे उदघाटन श्रीफळ वाढवून नव्हे, तर रिबीन कापून करू लागलो आहोत. सकाळी उठल्यावर 'कराग्रे वसते लक्ष्मी....' आज किती ठिकाणी म्हटली जाते ? सायंकाळी दिवे लागणीला शुभंकरोती करोती, रामरक्षा किती घरांत म्हटली जाते ? अनेक घरांत सायंकाळी दिवे लागणीला चालू केला जाणारा टीव्ही रात्री झोपतानाच बंद केला जातो. या दरम्यान विविध वाहिन्यांवर चालणारे डेली सोप काय शिकवतात, तर नात्यांमध्ये सूड कसा उगवावा, एकमेकांची संपत्ती कशी बळकवावी, अनैतिक संबंध कसे जोपासावेत आणि ते कसे लपवावेत, लिव्ह इन रिलेशनशिप मध्ये राहणे, विवाहबाह्य संबंध, लग्नापूर्वीचे शरीरसंबंध या सर्व गोष्टी यांमध्ये अति सामान्य करून दाखवल्य जातात. हल्लीच्या वेब सिरीजमध्ये खुलेपणाने दाखवली जाणारी शयनगृहातील दृश्ये, एकमेकांशी बोलताना केला जाणारा शिव्यांचा मुक्त वापर, अतिरंजित करून दाखवली जाणारी हिंसक दृश्ये या सर्वांचा परिणाम कुटुंबातील लहान आणि किशोरवयीन मुलामुलींवर होत असतो. दिवसागणिक स्त्री अत्याचाराचा वाढता आलेख, अमली पदार्थांचे देशभर पसरलेले जाळे, लव्ह जिहादला मिळणारी मोकळीक, सर्वच क्षेत्रांत पसरलेला भ्रष्टाचार यासर्वांमागे याचाही कुठेतरी हातभार लागतोच आहे.

विविध माध्यमांतून संस्कृतीचे अध:पतन होत असताना काही धार्मिक, सामाजिक आणि राष्ट्रप्रेमी संघटना मात्र समाजाच्या पुतरुत्थानासाठी अविरतपणे झटताना दिसतात. भरतभूमिला तिचे हरवलेले सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वैभव पुन्हा मिळवून देण्यासाठी कार्य करताना दिसतात. 'सनातन संस्था' आणि 'सेव्ह कल्चर सेव्ह भारत' या त्यापैकीच दोन संघटना. अध्यात्माची शास्त्रीय परिभाषेत ओळख करून देणारी सनातन संस्था सत्संग, प्रवचने, व्याखाने, राष्ट्र आणि धर्म विषयक प्रदर्शने तसेच ग्रंथ आणि नियतकालिके आदींच्या माध्यमातून आज घराघरात पोहोचली आहे. वेब सिरीज, सिनेमा, जाहिरात आदींच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीच्या होणाऱ्या ऱ्हासाविरोधात 'सेव्ह कल्चर सेव्ह भारत' संस्था मागील अनेक वर्षांपासून लढा देत आहे. सनातन संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून या दोन्ही संघटनांच्या संयुक्त विद्यमाने भारताची राजधानी दिल्ली येथील 'भारत मंडपम'मध्ये 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चे १३ ते १५ डिसेंबर या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची स्वराज्यविषयक ध्येय धोरणे, त्यांची युद्धनीती, त्यांचे युद्धकौशल्य, त्यांचे संस्कृती आणि धर्मप्रेम, त्यांच्यातील गुणग्राहकता, जीवास जीव देणारी माणसे जोडण्याची कला, 'जनतेच्या भाजीच्या देठालाही हात न लावता' त्यांनी केलेले राजकारण आणि एकूणच जगाच्या पाठीवरील त्यांचे अद्वितीयत्व या विषयांवर दोन दिवस अध्यात्मातील अधिकारी, संत-महंत, प्रवचनकार, सैन्यदलात भूषणावह कामगिरी बजावणारे माजी अधिकारी, राष्ट्र आणि धर्मविषयक आस्था असलेले लोकप्रतिनिधी, मंत्री या कार्यक्रमात आपले विचार मांडणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांसह देशभरात होऊन गेलेले पराक्रमी राजे-महाराजे यांचा हस्तस्पर्श लाभलेली शस्त्रे, अस्त्रे, चिलखती, शिरस्त्राण तसेच विविध आयुधे यांचे भव्य प्रदर्शन या निमित्ताने येथील प्रदर्शन कक्षात भरवण्यात येणार आहे. राजधानी दिल्लीत पहिल्यांदाच अशा प्रकारचे शस्त्रप्रदर्शन भरवण्यात येणार आहे. त्यामुळे समस्त दिल्लीचे लक्ष त्याकडे लागले आहे. राष्ट्र, धर्म आणि संस्कृतीचा जागर करणारा आणि शिवरायांच्या हिंदवी स्वराज्यासम सनातन राष्ट्र स्थापण्यासाठी जनतेला दिशा देणारा शंखनाद महोत्सव भविष्यात दिल्लीच्या इतिहासात सुवर्णक्षरांनी लिहिला जाईल यात दुमत नाही !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या नूतन इमारतीचे सोमवारी भूमिपूजन



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.१३, मिरा-भाईंदर :** मीरा – भाईंदरच्या प्रशासकीय इतिहासात एक महत्त्वपूर्ण अध्याय जोडला जाणार असून, नव्याने सुरू झालेल्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या भव्य नूतन इमारतीचे भूमिपूजन सोमवार, १५ डिसेंबर रोजी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे.

मीरा – भाईंदर शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या आणि वाढत्या वाहनसंख्येचा विचार करता, स्वतंत्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची गरज गेल्या अनेक वर्षांपासून नागरिक व्यक्त करत होते. या मागणीची दखल घेत, स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून प्रताप सरनाईक यांनी गेल्या तीन वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा केला. परिणामी, नागरिकांना परिवहन विषयक कामांसाठी ठाण्याला करावी लागणारी धावपळ, होणारा वेळेचा अपव्यय आणि अतिरिक्त खर्च आता इतिहासजमा होण्याच्या मार्गावर आहे. परिवहन मंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर सरनाईक यांनी ही मागणी प्राधान्याने मार्गी लावत चक-५८ (मीरा–भाईंदर) या नवीन उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची स्थापना केली. सुरुवातीला जागेच्या मर्यादेमुळे इमारत उभारणीला अडथळे येत होते. मात्र, महसूल विभागाकडील जमीन परिवहन विभागाकडे हस्तांतरित करून, सुमारे १५ कोटी रुपये खर्चून सुसज्ज आणि आधुनिक इमारत उभारण्याचा मार्ग त्यांनी मोकळा केला. सोमवारी होणाऱ्या या भूमिपूजन समारंभामुळे मीरा–भाईंदरच्या नागरिकांना अधिक सुलभ, जलद आणि आधुनिक परिवहन सेवा उपलब्ध होण्याचा मार्ग प्रशस्त होणार असून, शहराच्या प्रशासकीय विकासाला नवी दिशा मिळणार आहे.

## मुदखेड शहरांत आगीत दोन दुकाने जळून खाक



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१३, मुदखेड (नांदेड) :** येथिल शिवाजी नगर भागातील रेलवे भुयारी मार्गवरील गजानन सोनटक्के यांचे चप्पल बुटाचे दुकान व चंद्रकात बास्टेवाड यांच चे ड्रायक्लीनिंग चे दुकान १२ डिसेंबर रोजी मध्य रात्री अचानक लागलेल्या आगीत जळून खाक झाले आहे. सोनटक्के व बास्टेवाड यांनी ३ महिन्यांपूर्वीच बँकेचे व खाजगी कर्ज उचलून नविन फर्निचर बनुन नविन व्यवसायाला सुरुवात केली. गजानन सोनटक्के यांनी अत्यंत गरीब परिस्थितीतून स्वकष्टाने लोकांचे चप्पल बूट शिवून परिस्थितीवर मात करत एक एक रुपया जमा करून बँक लोन मित्रांकडून उसने घेऊन स्वतःच्या व्यवसाय उभारला होता नव्या व्यवसायाला ३ महिने पण झाले नाही की काल रात्री अचानक त्यांच्या दुकानात आग लागली व त्यांची पूर्ण दुकान त्यांच्या समोर जळून खाक झाली. त्या दुकान बरोबर त्याचं स्वप्न जाळल्याची भावना त्याची भावना व्यक्त केली. दुकानाची आग तत्परतेने शमवता आली असती परंतु गेंडा कातडीच्या व संवेदना हीन नगरपरिषदेच्या यंत्रणेन या कामी ज्या तत्परतेने मदत करने अपेक्षीत होत ती तत्परता न .प . कडून मदत मिळाली नसल्याची प्रत्यक्ष दर्शनी सांगीतले. परिसरातील नागरीकांच्या तत्परतेने आगीवर नियंत्रण मि ळवले तोपर्यंत सोनटक्के यांच दुकान १००% जळून खाक झालं होत. घटनेची गंभीरता समजताच पोलीस यंत्रणा मदतीसाठी पुढे आली होती . या दोन्ही क्षतीग्रस्त नव व्यवसायीकानां आर्थिक मदत मिळावी यासाठी सोशल मिडिया माध्यमांतून आवाहन केले त्या अनुषंगाने अनेकांनी सढळ हाताने व उदार मनाने मदत करत त्या दोन व्यवसायीकांना सावरण्याचे बळ दिले त्याबद्दल क्षत्ती ग्रास्थांनी सर्वाचे आभार मानले.

## जुन्या युनिट्समुळे वाढते प्रदूषण, नवीन औष्णिक प्रकल्प आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित हवा – आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** चंद्रपूर शहरात कार्यरत असलेल्या औष्णिक विद्युत केंद्रात कालबाह्य व जुनी युनिट्स अद्याप सुरू असल्याने प्रदुषणाचे प्रमाण वाढत असून प्रस्तावित ८०० मेगावॅट क्षमतेचा नवीन प्रकल्प आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असावा, अशी मागणी हिवाळी अधिवेशनात बोलतांना आ. किशोर जोरगेवार यांनी केली आहे. नागपूर येथे सुरू असलेल्या विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या लक्षवेधी सूचनेवर बोलताना आ. किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्राशी संबंधित महत्त्वाचा व गंभीर मुद्दा सभागृहासमोर मांडला. चंद्रपूर शहरात कार्यरत असलेल्या सध्याच्या औष्णिक विद्युत प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण वाढत असल्याचे त्यांनी यावेळी बोलतांना सांगितले. चंद्रपूर सीटीपीएसम ध्ये ८०० मेगावॅट क्षमतेचे नवीन प्रकल्प प्रस्तावित आहेत का, असा थेट प्रश्न



### ९ हजार ८९२ कोटी रुपयातून तयार होणार प्रकल्प

यावेळी त्यांनी शासनाला विचारला.

यावर शासनाने सकारात्मक उत्तर देत नवीन संच उभारण्याची तयारी सुरू असल्याचे स्पष्ट केले. चंद्रपूर हे मुंबई भद्रावती एचव्हीडीसी डीसी ग्रीड लाईनजवळ असल्याने वीज वहनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे केंद्र आहे. यासोबतच रेल्वे कनेक्टिव्हिटी, मुबलक पाण्याची उपलब्धता आणि वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडकडून कोळशाचा नियमित पुरवठा या सर्व बाबी चंद्रपूरच्या बाजूने अनुकूल असल्याचे त्यांनी यावेळी सभागृहाला सांगितले.

मात्र, जुन्या व प्रदूषण वाढवणार्या युनिट्समुळे चंद्रपूर शहरातील नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे त्यांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिले. या जुन्या युनिट्सऐवजी अल्ट्रा सुपर क्रिटिकल तंत्रज्ञानावर आधारित ८०० मेगावॅट क्षमतेचे नवीन प्रकल्प टप्प्याटप्प्याने उभारावेत आणि अशी ठाम मागणी आ. किशोर जोरगेवार यांनी यावेळी केली. या मागणीला उत्तर देताना मंत्री मेघना बोर्डीकर यांनी भविष्यात उभारण्यात येणारे प्रकल्प आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असतील, ज्यामुळे प्रदूषणात लक्षणीय घट होईल आणि कमी कोळशातून अधिक वीज निर्मिती शक्य होईल, असे सांगितले आहे. तसेच ८०० मेगावॅट क्षमतेच्या या प्रकल्पासाठी अंदाजे ९ हजार ८९२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याची माहितीही त्यांनी सभागृहात दिली.चंद्रपूर शहरातील वाढते प्रदूषण कमी करून नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठीच ही मागणी करण्यात आल्याचे आ. किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे. या चर्चेमुळे चंद्रपूरच्या पर्यावरणीय प्रश्नांवर शासनाचे लक्ष केंद्रित झाले असून, भविष्यात प्रदूषणमुक्त आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित वीज प्रकल्प उभारल्या जाणार आहे.

## प्लग अ‍ॅन्ड प्ले या धर्तीवर आदिवासी औद्योगिक क्षेत्र विकसित करावे - आ.मुनगंटीवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्हयातील पोंभुर्णा आणि गोंडपिपरी तालुक्यातील करंजी येथील एम आयडीसी मध्ये प्लग अ‍ॅन्ड प्ले या धर्तीवर आदिवासी औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी शासन निश्चीतपणे सकारात्मक विचार करेल. यापूर्वी नाशिक येथे अशा यशस्वी प्रयोग करण्यात आला आहे. तोच प्रयोग चंद्रपूर जिल्हयातील या दोन एमआयडीसी मध्ये करण्यात येईल असे आश्वासन उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत दिले. आ. सुधीर मुनगंटीवार यांनी उपस्थित केलेल्या अर्धा तास चर्चेदरम्यान उद्योग मंत्र्यांनी वरील आश्वासन दिले. या अर्धा तास चर्चेदरम्यान बोलताना आ. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, आपण स्वातंत्र्यांचा अमृत महोत्सव साजरा केला. मात्र



आदिवासी युवकांच्या सर्वांगिण विकासासाठी जलदगतीने प्रयत्न होताना दिसत नाहीत. चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी तरूण तरूणींना उद्योजक बनविण्यासाठी आदिवासी औद्योगिक क्षेत्र निर्माण करणे आवश्यक आहे. आदिवासींचे उत्थान करण्यासाठी आपण विविध योजना राबवितो. मात्र आदिवासी तरूणांमधून उद्योजक तयार होताना दिसत नाहीत. चंद्रपूर जिल्हयाचे आदिवासी सुपुत्र क्रांतीवीर बाबुराव पुलेश्वर शेडमाके हे ब्रिटीशांविरूध्द संघर्ष करताना शहीद झाल्याचा जाज्वल्य इतिहास आहे. मी अर्थमंत्री असताना चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी तरूण–तरूणी आठ महिन्यांच्या प्रशिक्षणात मिशन शौर्य या अभियानाअंतर्गत माऊंट एव्हरेस्ट सारख्या शिखरावर चढले. देशाच्या पंतप्रधानांनी या युवकांचे आपल्या भाषणात कौतुक केले. आदिवासी तरूण प्रामामिक आहेत, शूर आहेत मग त्यांना संधी का दिली जात नाहीत, असा सवाल करत आदिवासी वसतीगृहांमध्ये लागणारे गणवेश व इतर वस्तु पुरविण्यासाठी आदिवासी संस्था, आदिवासी व्यक्ती यांना संधी देण्याची मागणी त्यांनी यावेळी केली.

बल्लारपूर येथे रू.१२.५० कोटी निधी खर्चून सुषमा स्वराज महिला सक्षमीकरण केंद्र तयार करण्यात आले आहे. अशाच पध्दतीने आदिवासींना कौशल्य विकासाची संधी उपलब्ध करण्यासाठी केंद्र सरकारच्या योजनांशी इंटीग्रेट करण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादीत केली. ट्रायबल को–ऑपरेटीव्ह मार्केटींग फेडरेशन च्या माध्यमातुन कृषी आधारित, वनआधारित उद्योग चंद्रपूर जिल्हयातील एमआयडीसी मध्ये स्थापन करण्याची आवश्यकता असल्याचेही ते म्हणाले. चंद्रपूर जिल्हा हा आदिवासी बहुल जिल्हा असल्यामुळे हा प्रयोग चंद्रपूर जिल्हयातील पोंभुर्णा आणि करंजी या एमआयडीसीमध्ये राबवावा व त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करावा, अशी मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केली. यासंदर्भात लवकरच दोन्ही विभागांच्या सचिवांसह उच्चस्तरीय बैठक घेवून पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिले.

# नाशिकमध्ये तरुणाला संपवलं, बॉडीची ओळख करणंही कठीण

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, नाशिक :** नाशिक तालुका पोलीस स्टेशन येथे २९ नोव्हेंबर २०२५ रोजी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील अनोळखी मृत व्यक्तीला गोवर्धन शिवारात फाशीच्या डोंगराजवळ निर्जनस्थळी नेत धारदार हत्याराने डोक्यात, तोंडावर, पायावर वार करुन गंभीर जखमी करुन त्याची हत्या करण्यात आली होती. मृताच्या चेहऱ्यावरील सुकलेल्या रक्तामुळे त्याचा चेहरा ओळखू येत नव्हता. मात्र आता या हत्येमागचा आरोपी पोलिसांच्या ताब्यात आला आहे. पोलिसांनी मोठ्या शिताफीने आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत.

नेमकं काय घडलं?

वासुदेव देसले एस.डी.पी.ओ. यांनी दिलेल्या सुचनेनुसार नाशिक तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मृदुला नाईक यांनी घटनास्थळावर दोन तपास पथकं तयार करुन अनोळखी मृताची अंबड, सातपुर एम.आय.डी. सी. परिसरात, सी.सी.टी.व्ही. कॅमेरे, तसंच कंपनीमधील मॅनेजर, बांधकाम साईड येथे बाहेरुन आलेल्यांकडून मृत मजुरांची ओळख पटवण्याचं काम तातडीने सुरू करण्याबाबत तपास पथकाला आदेश दिले होते.

त्यानुसार २९ नोव्हेंबर २०२५ रोजी तपास पथकाने एम.आय.डी.सीम धील कंपनी व्यवस्थापनाला मृत फोटो पाठवले. त्याप्रमाणे ऋषिकेश अनिल




पांडे (रा. सातपुर) याने घटनास्थळी येत मृत अरविंद उर्फ पप्पु पशुपतीनाथ पांडे, वय ४०, (ह. रा. सातपुर, नाशिक मु. रा. बडकीस नदीया, ता. आरा, जि. भोजपुर, राज्य बिहार) याचा मृतदेह ओळखला. त्यानंतर तपासाची चक्रं फिरवून आणि मानवी कौशल्य वापरून गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्यात आला.पोलीस निरीक्षक यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, गुन्ह्यातील मृत २८ नोव्हेंबर २०२५ रोजी दारु पित होता. तपास पथकामार्फत परिसरातील दारु दुकानांचं सी.सी.टी.व्ही कॅमेरे चेक केले. यावेळी मृत व्यक्तीला मंजय पंडित आणि धर्मे द्र पंडीत रा. बिहार हे दारु पिल्यानंतर मोटार सायकलवर घेऊन गेल्याचं दिसत होतं. त्यानुसार पोलीस निरीक्षक यांनी बातमीदारामार्फत संशयीत आरोपी मंजय पंडीत याचा पुर्ण पत्ता मिळवून तात्काळ तपास पथक बिहार राज्यात पाठवलं. तपास पथकाने अहोरात्र मेहनत करत आरोपी मंजय केशव पंडीत याला त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेतलं. कोर्टाने आरोपीला ७ दिवस पोलीस कस्टडी दिली असून त्याच्याकडे गुन्ह्यात वापरलेला चाकू, मोटारसायकल, रक्ताचे कपडे अशा वस्तू आढळल्या आहेत.

गुन्ह्यातील मुख्य संशयित आरोपीची बहिण सातपुरमध्ये राहत असल्याने तिच्याकडून माहिती घेत गुन्ह्यातील आरोपी धर्मेद्र पंडीत हा वृंदावन, उत्तर प्रदेश येथे असल्याची माहिती मिळानी. त्यानंतर वरीष्ठांच्या आदेशान्वये तपास पथक वृंदावन, उत्तर प्रदेश राज्यात पाठवण्यात आले. तपास पथकाने कसोशीने शोध घेत गुन्ह्यातील मुख्य आरोपी धर्मेद्र शिवनारायण प्रजापती (वय २६ मुळ रा. रायपुर, ता. छपरा, जि. सारन, राज्य बिहार ) याला ताब्यात घेतलं आहे. त्यानंतर या संशयिताला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला ३ दिवस पोलीस कस्टडी रिमांड दिली आहे.

# सिमेंट मिक्सर–पॅगो रिक्षाची समोरासमोर धडक दोन जणांचा मृत्यू अनेक जखमी

## लग्नावरून परतणाऱ्या कुटुंबावर काळाचा घाला !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, जळगाव :** जामनेरमध्ये भीषण अपघाताची घटना घडली आहे. या अपघातात आतापर्यंत दोन जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. तर अनेक जण गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. या अपघातामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

सिमेंट मिक्सर ट्रक आणि पॅगो रिक्षा यांच्यात समोरासमोर धडक बसल्याने हा भीषण अपघात झाला आहे. या अपघातानंतर परिसरात हाहा:कार उडालेला बघायला



मिळाला. प्रचंड आक्रोश आणि किंचाळ्या बघायला मिळाल्या. या घटनेनंतर तातडीने स्थानिक नागरीक आणि रस्त्याने जाणारे काही नागरीक मदतीसाठी धावले. पण या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला आहे. जाम नेर तालुक्यातील गारखेडा परिसरात ही भीषण अपघाताची घटना घडली. सिमेंट मिक्सर ट्रक आणि पॅगो रिक्षा यांच्यात झालेल्या भीषण अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. सिमेंट मिक्सरने पॅगो रिक्षाला समोरासमोर धडक दिल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

या अपघातात निकिता गोपाळ निंबाळकर या तरुणीचा जागीच मृत्यू झाला आहे. ती चिंचखेडाची रहिवासी होता. यासोबतच तळेगावचे ३२ वर्षीय रहिवासी प्रमोद श्रीराम गुरूभैया यांचादेखील या अपघातात मृत्यू झाला आहे.या दुर्घटनेत जीव गमावलेल्या निकीता निंबाळकर या तरुणीचा काही दिवसांपूर्वीच साखरपुडा झाला होता.

त्यामुळे निंबाळकर कुटुंबावर शोककळा पसरली आहे. निंबाळकर कुटुंब भुसावळ येथे लग्न समारंभ आटोपून जामनेर तालुक्यातील चिंचखेडा येथे घरी परतत होते. एकाच पॅगो रिक्षात ८ ते १० प्रवासी असल्याची माहिती असून गारखेडा जवळ सिमेंट मिक्सर ट्रक आणि रिक्षाची समोरासमोर जोरदार धडक झाली.

या अपघातात १६ वर्षीय जयेश गोपाळ निंबाळकर, ३९ वर्षीय सरला गोपाळ निंबाळकर, ४५ वर्षीय चिंचचे रहिवासी योगेश विठ्ठल गायकवाड, नांभाजी नगरचे ५० वर्षीय सुरेखा विलास कापडे, तसेच उत्तर प्रदेशचे ५० वर्षीय रहिवासी अखिलेश कुमार आणि संभाजीनगरच्या ५० वर्षीय महिला संगीता सुभाष चौधरी हे जखमी झाले आहेत. अपघातानंतर जखमींना तातडीने प्राथमिक उपचार देऊन जळगाव जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आल्याची माहिती डॉक्टर चांदा यांनी दिली. घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त होत असून पुढील तपास संबंधित यंत्रणेकडून सुरू आहे.

# जाहिरातीच्या बॅनर परवानगीचे दर कमी केल्यास पालिकेचे उत्पन्न वाढेल - तनुजा मढवी (माजी नगरसेविका, नवी मुंबई)

**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.१३, जुईनगर (नवी मुंबई) :** निवडणुकांचे वारे वाहण्यास सुरुवात झाली असताना भावी व इच्छुक नगरसेवक, तसेच इच्छुक उमेदवारांनी बॅनरबाजीचा धडाका लावला आहे, मात्र महानगर पालिकेकडून बॅनर लावण्यासाठी परवानगी घेणे आणि त्या जागेचे भाडे देणे आवश्यक आहे. त्यातून पालिकेला उत्पन्न मिळणार असते.



नवी मुंबई महानगर पालिकेकडून जाहिरातीचे बॅनर लावण्याकरिता घेतल्या जाणाऱ्या शुल्काची रक्कम, बॅनर छपाई पेक्षा जास्त आहे. शिवाय परवानगीची प्रक्रिया किचकट आहे. त्यामुळे नाकापेक्षा मोती जड अशी अवस्था होते. मग जाहिरात करावी तर कशी करावी, असा प्रश्न पडणे साहजिक आहे.

जाहिरातीचे डीटीपी करणे, प्रिंट करणे, फ्रेम करणे, त्यानंतर ते आपल्या कार्यकर्त्यांद्वारे लावणे इत्यादी गोष्टी करताना खर्च जास्त प्रमाणात होत असतो. त्याच्यावर आणखी महानगरपालिकेला पैसे द्यावे लागतात, तेही खूप जास्त आहेत.

जाहिरातीचे तयार करण्याचे दर कमी आणि जाहिरात लावण्यासाठी महानगरपालिकेचे भाडे जास्त, म्हणजेच चार आण्याची कोंबडी आणि बारा आण्याचा मसाला अशी अवस्था झाली आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवार किंवा जाहिरातदार या भानगडीत पडण्यापेक्षा अनधिकृत पणे लावलेली जाहिरात 'काढली तर काढली' असा विचार करतो आणि जाहिरात लावून टाकतो, त्यामुळे महानगरपालिकेचे उत्पन्न बुडतेच बुडते, पण त्या अनधिकृत जाहिराती काढण्यासाठी पालिकेला आणखी खर्च करावा लागतो. खाया पिया कुछ नही, गिलास तोडा बारा आना अशी अवस्था महानगरपालिकेची होत असेल तर त्याला खुद्द पालिका प्रशासनच जबाबदार आहे.

सध्या निवडणुकीचे दिवस असल्यामुळे महानगरपालिकेला जाहिरात या माध्यमातून पैसे मिळविण्याचे एक उत्तम साधन प्राप्त झाले आहे. परंतु त्याकरिता त्यांनी सर्वसामान्यांना परवडतील असे जाहिरातीच्या जागेचे दर ठेवणे गरजेचे आहे. तसे झाल्यास सर्वसामान्य उमेदवारही जाहिरात लावू शकेल आणि जितके दिवस ती जाहिरात राहील तितके दिवस त्यालाही अभय राहील आणि महानगरपालिकेलाही त्याचे भाडे मिळत राहील.

महानगरपालिकेने लवकरात लवकर याचा विचार करून बुडणारे उत्पन्न मिळवून घेतले पाहिजे. विचारविनिमय करून जाहिरातीचे दर कमी केले, तर नक्कीच जाहिरातीच्या उत्पन्नात भर पडेल आणि सर्वसामान्य उमेदवारांना दिलासा मिळेल. असे मत जुईनगरच्या माजी नगरसेविका तनुजा मढवी यांनी व्यक्त केले आहे.

# आळंदीतील पथविक्रेत्यांवर होणारी अन्यायकारक कारवाई तात्काळ थांबवावी

## अन्यथा नगरपरिषदेच्या समोर लक्षवेधी बोंब मारो धरणे आंदोलन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, आळंदी (पुणे) :** आळंदी शहरातील पथविक्रेत्यांवर आळंदी नगरपरिषदेच्या वतीने अन्यायकारक कारवाई करण्याचे मनमानी कारभारातून चालू आहे. आळंदी भाजी मंडईतील चौपाळ मागील ३५ ते ४० भाजी स्टॉल धारक बसतात. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी केंद्रे यांच्या परवानगीतूनच हे सर्व रोडवर बसणारे पथारी धारक चौफळच्या मागील बाजूस बसवण्यात आलेले आहेत,पण अतिक्रमण विभाग गायकवाड नावाचा अधिकारी आपल्या मनमानी कारभारातून भाजी मंडईतील पथविक्रेत्यांवर आरेरावी करत आहे. सर्वोच्च न्यायालय,केंद्र शासन,राज्य शासनाने पथविक्रेत्यांना संरक्षण देऊन त्यांच्या हक्कासाठी पथविक्रेता अधिनियम २०१४ हा कायदा केला असताना आळंदी शहरात पथविक्रेता समिती असताना या अधिकाऱ्याने पथविक्रेता समितीला विचारात न घेता कायद्याला बाजूला करत आपल्या मनमानी कारभारातून आणि दादागिरीतून पथविक्रेत्यांमध्ये एक भीतीचे वातावरण निर्माण करत मी लोखंडी गेट लावण्याच आसे सांगून दमदाटीच्या भाषेत पथविक्रेत्यांना बोलून कोणालाही बोलवा मी कोणाच्याही बापाला घाबरत नाही असे बोलल्यानंतर,



या विषयाबद्दल सर्व भाजी मंडईतील संघटनेचे कार्यकर्ते,पदाधिकारी,महिला आघाडी यांनी तत्काळ संघर्ष नायक आदरणीय भगवानराव वैराट साहेब यांची भेट घेऊन सविस्तर झालेला प्रकार साहेबांच्या कानावर घातला त्यानंतर आदरणीय वैराट साहेब यांनी पुणे जिल्हा अध्यक्ष संतोष सोनवणे यांना आपले शिष्टमंडळ घेऊन मुख्याधिकारी साहेब यांच्याशी चर्चा करुण निवेदन द्या

चर्चेतून जर मार्ग निघला तर ठीक आहे नाहीतर कायद्याच्या माध्यमातून आंदोलन करण्याची तयारी करा असे सांगितल्यानंतर पुणे जिल्हा अध्यक्ष संतोष सोनवणे यांनी आपल्या आळंदी शहरातील प्रमुख पदाधिकारी घेऊन संबंधित अधिकारी काळे सर यांच्याशी मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात चर्चा करत सर्वोच्च न्यायालय,केंद्र शासन,राज्य शासनाने वेळोवेळी धोरण केललं आहे कायदा केलेला आहे या कायद्याची आठवण करून देत या गोरगरीब पथविक्रेत्यांवर अन्यायकारक कारवाई करू नका कायद्याप्रमाणे त्यांना योग्य ठिकाणी पुनर्वसन करा आणि पुनर्वसनाची जागा निश्चित होईपर्यंत आहे त्याच ठिकाणी त्यांना व्यवसाय करण्याची परवानगी द्या अशी चर्चा करत असताना संबंधित अधिकारी काळे सर यांनी सकारात्मक उत्तर देत आपण काळजी करू नका मुख्याधिकारी सोमवारी आल्यानंतर आपण त्यांच्याशी चर्चा करू आणि चांगला मार्ग आपण काढू मुख्याधिकारी साहेबांशी चर्चा होईपर्यंत कोणते प्रकारची कारवाई होणार नाही असे काळे यांनी सांगितल्यानंतर पथविक्रेत्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले, संतोष सोनवणे यांनी आपण जे कराल ते कायद्याप्रमाणे असावे हीच मागणी आमची आहे कारण सर्वोच्च न्यायालय, केंद्र शासन,राज्य शासनाने वेळोवेळी पथविक्रेत्यांचे राहणीमान उंचावण्यासाठी आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक योजना देऊन त्यांना संरक्षणही दिले आहे त्यामुळे जे काय कराल ते कायद्याप्रमाणे असावे आणि या निवेदनाची आपण योग्य दखल न घेतल्यास महाराष्ट्र राज्य कामगार सुरक्षा दल संलग्न महाराष्ट्र राज्य पथारी सुरक्षा दलाच्या वतीने नगरपरिषदेच्या समोर लक्षवेधी बोंब मारो धरणे आंदोलन करण्यात येईल याची आपण दखल घ्यावी.

शिष्टमंडळाचे नेतृत्व पुणे जिल्हा अध्यक्ष संतोष सोनवणे यांनी केले,सोबत सचिन काळे,निलेश ढोकणे,नवनाथ बोडरे,गजानन मिटकरी, राहुल रायबोले,सागर मुंडे, नवनाथ तिडके,नितीन भुजबळ,संतोष बवले, रितेश नितनवरे,गोरक्षनाथ खांडे,कोळेकर दादा, खलाटे,महाजन बाबा, विकास धामणे, एकनाथ मोरे, सह पदाधिकारी कार्यकर्ते महिला आघाडी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वायू व ध्वनी प्रदूषण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १८ विकासकांवर बांधकाम स्थगितीची कारवाई

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि१३, नवी मुंबई :** महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी बांधकाम व पुनर्विकासाची कामे सुरु आहेत. या कामांमुळे होणारे ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषण व ब्लास्टिंगच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या तक्रारींस अनुसरून उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्वतःहून दाखल करुन घेतलेली (Suo Moto) जनहित याचिका क्र.३/ २०२३ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.११ डिसेंबर २०२३ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार वायू प्रदूषण कमी करण्याबाबत आदेश दिलेले आहेत. या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मान्यतेने दि.१ ऑगस्ट २०२४ रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व विकासक, वास्तुविशारद यांची सर्व विभागांचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी यांच्यासमवेत ध्वनी व वायू प्रदूषणास प्रतिबंध करणेकरिता जाहीर मानक कार्यप्रणालीचे पालन करणेबाबत सूचना करणेकरीता दि. ०६ नोव्हेंर २०२५ रोजी बैठक आयोजित केली होती. या बैठकीमध्ये सहायक संचालक नगररचना सोमनाथ केकाण यांनी सर्व विकासकांना मानक कार्यप्रणालीची सविस्तर माहिती देत त्याचे काटेकोरपणे पालन करावे अशा सूचना दिल्या होत्या व ज्या विकासकांकडून सदर मानक कार्यप्रणालीचे उल्लंघन होईल अशा विकासकांना दंड आकारण्यात येईल तसेच याबाबत गांभीर्याने कार्यवाही न झाल्यास सदर विकासकांच्या प्रकल्पांना बांधकाम स्थगिती आदेश (Stop Work) देण्यात येतील, असे स्पष्टपणे सूचित केले होते. सध्या हिवाळी कालावधीत वातावरणातील वाढलेले धूळ आणि धुळीचे प्रमाण लक्षात घेत त्यादृष्टीने विविध उपाययोजना करताना बांधकाम साईट्सवर प्रदूषण प्रतिबंधात्मक नियमांचे पालन केल जात असल्याबाबत प्रत्यक्ष साईट्सला भेट देऊन तपासणी करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार मानक कार्यप्रणालीची प्रत्यक्ष जागेवर अंमलबजावणी योग्य रितीने होत असलेबाबतची खातरजमा करणेकरिता नगररचना विभागामार्फत अभियंत्यांची विभागनिहाय पथके तयार करण्यात आली होती. या



अभियंत्यांनी बांधकाम सुरू असलेल्या प्रकल्पांच्या ठिकाणी जाऊन पाहणी केली असता एकूण ८५ प्रकल्पांच्या ठिकाणी सदर कार्यप्रणालीचे पूर्णपणे पालन होत नसल्याचे निदर्शनास आले होते. त्यानुसार दि.२६ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर ८५ प्रकल्पांच्या विकासकांना अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कार्यवाही करणेबाबत तसेच उक्त मानक कार्यप्रणालीतील बाबींची त्वरीत पूर्तता करुन पुढील ७ दिवसात आपला खुलासा सादर करणेबाबत सूचित करण्यात आले होते. अन्यथा त्यांच्या भूखंडावर देण्यात आलेल्या बांधकाम परवानगीस काम स्थगिती (डीँ थिअ‍ॅज्ञ) आदेश देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल, असे कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने एकूण ८५ प्रकल्पांपैकी १८ प्रकल्पांच्या विकासकांनी मानक कार्यप्रणालीतील प्रमुख बाबींची पूर्तता न केल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित प्रकल्पांना महापालिका आयुक्त यांच्या मान्यतेने बांधकाम स्थगिती (Stop Work) आदेश देण्यात आलेले आहेत.

नवी मुंबईतील पर्यावरणाविषयी जागरूक राहत वायूप्रदूषण प्रतिबंधासाठी ठोस पावले उचलली जात असून १८ बांधकामांना दिलेले स्थगिती आदेश हा त्याच उपाययोजनांचा एक भाग आहे.

# थोडक्यात

## नूतन वर्ष 'भेटकर्ड' बनविणे स्पर्धा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, मुंबई :** 'जॉय' सामाजिक संस्थेच्या वतीने येणाऱ्या २०२६ नूतन वर्षा निमित्त स्वहस्ते भेटकार्ड (ग्रीटिंग कार्ड) तयार करणे स्पर्धा आयोजित करण्यात आली असून यासाठी जुन्या टाकावू वस्तू वापरून नवे भेटकार्ड स्वहस्ते तयार करायचे आहे. तसेच आपल्या वडीलांप्रती एखादी चारोळी, ५० शब्दांत भावना किंवा कविता स्वहस्ते लिहून त्याचा त्याच कार्डवर उल्लेख करायचा आहे. कार्ड पाठविण्याची अंतिम तारीख ३१ डिसेंबर असून आपली कार्ड जॉय सामाजिक संस्था मुंबई, संस्थापक अध्यक्ष गणेश हिरवे २/१२ पार्वती निवास रामनगर बांद्रेकरवाडी जोगेश्वरी पूर्व मुंबई ४०००६० फक्त कुरिअर आणि स्पीड पोस्टने पाठवायची आहेत. अधिक माहितीसाठी ९९२०५८१८७८ संपर्क करण्याचे आवाहन समन्वयक वैभव पाटील यांनी केले आहे. प्रथम तीन क्रमांक आणि दोन उत्तेजनार्थ अशी बक्षिसे असून विजेत्यांना सन्मानचिन्ह, मेडल, सन्मानपत्र देण्यात येणार आहेत. परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल.

## मुंबईत आज तिन्ही मार्गावर पूर्णवेळ मेगाब्लॉक



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१३, मुंबई :** मुंबईत आज तिन्ही मार्गांवर पूर्णवेळ मेगाब्लॉक असणार आहे. यामुळे आज रविवारी प्रवाशांनी घराबाहेर पडण्याअगोदर मेगाब्लॉकचा वेळ जाणून घेणे महत्वाचे आहे. तिन्ही मार्गांवर आज म्हणजेच रविवारच्या दिवशी मेगाब्लॉक आहे. ज्यामुळे प्रवाशांचे अतोनात हाल होण्याची शक्यता आहे.लोकल प्रवाशांसाठी ही अत्यंत महत्वाची बातमी आहे.या बंद दरम्यान ट्रान्स-हार्बरवरील सर्व सेवा रद्द करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला. मध्य, हार्बर आणि पश्चिम रेल्वे मार्गावर विविध अभियांत्रिकी कामांसाठी आज रविवारी मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. यामुळे लाखो प्रवाशांच्या वेळापत्रकावर परिणाम होणार आहे. काही वेळ गाड्या पूर्णपणे बंद ट्रान्स-हार्बर असतील. ट्रान्स-हार्बर मार्गावर ठाणे आणि वाशी/नेरूळ स्थानकांदरम्यान सकाळी ११.१० ते दुपारी ४.१० वाजेपर्यंत सेवा पूर्णपणे रद्द राहणार आहे. मध्य रेल्वेवर परिणाम: माटुंगा ते मुलुंड दरम्यान अप आणि डाऊन जलद मार्गावर सकाळी ११.०५ ते दुपारी ३.४५ वाजेपर्यंत ब्लॉक राहील. या वेळेत जलद लोकल या धीम्या मार्गावर वळवण्यात येतील. धीम्या आणि जलद लोकल यादरम्यानच्या काळात एकाच मार्गावरून धावतील. मेगाब्लॉकचा परिणाम पश्चिम रेल्वेवर होणार आहे.दरम्यान पश्चिम रेल्वेनेही मेगाब्लॉक जाहीर केल्याने बोरिवली ते गोरेगाव दरम्यान अप आणि डाऊन धीम्या मार्गावर सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत ब्लॉक असेल. या वेळेत धीम्या लोकल जलद मार्गावर धावतील आणि काही लोकल रद्द राहतील. तर ब्लॉकदरम्यान बोरिवली स्थानकावरील फलाट क्रमांक १ ते ४ पूर्णपणे बंद राहणार आहेत. विशेषता ट्रान्स-हार्बर मार्गावर ठाणे वाशी नेरूळदरम्यान सर्व लोकल सेवा पूर्णपणे रद्द राहणार आहेत. यादरम्यान एकही लोकल धावणार नाही. लोकलसेवा पूर्णपणे बंद असल्याने प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागणार आहे. प्रवाशाची गैरसोय होऊ नये यासाठी प्रवाशाने वेळापत्रक पाहून आपला प्रवास करावा पर्यायी मार्गांचा वापर करावा असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे. तिन्ही रेल्वे मार्गांवर ब्लॉक असल्याने प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागणार हे स्पष्ट आहे.

## लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त चौकाची स्थापना




**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.१३, केज :** दिनांक १२ डिसेंबर २०२५ रोजी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंती निमित्त केज येथील शिक्षक कॉलनी, बीड रोड केज मध्ये विशेष उत्साहाचे वातावरण होते. लोकनेते मुंडे साहेब यांच्या कार्याचे स्मरण करून हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आणि याच निमित्ताने शिक्षक कॉलनीत बीड रोडला त्यांच्या नावाने एका चौकाची स्थापन करण्यात आली. यावेळी 'लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब चौक' शिक्षक कॉलनी केज असे नामकरण करून त्याचे लोकार्पण करण्यात आले. या महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी स्थानिक युवकांनी व कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला. पत्रकार प्रकाश मुंडे, चंदू चौरे, अमोल ठोंबरे, हानुमंतराव चौरे,गोटू भैय्या पाळवदे, अमोल मुंडे, योगेश हांगे, सोनू वैभव धस, अमोल धस, रोहित मुंडे, अमोल घुले, गणेश ढाकणे, सचिन मुंडे,प्रविण थोरात आणि राजा राऊत यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे हा कार्यक्रम अतिशय यशस्वी आणि प्रेरणादायी ठरला. शिक्षक कॉलनीतील या चौकामुळे स्वर्गीय मुंडे साहेब यांच्या स्मृतीला कायम उजाळा मिळेल, अशी भावना यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

## बिलोली येथील श्रीसाई बाबा पालखी दिंडी शिर्डीकडे मार्गस्थ

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१३, मुदखेड (नांदेड) :** हजारो साई भक्तांचे श्रद्धास्थान असलेले बोधन रोड बिलोली येथील श्रीसाई बाबा पालखी पायी दिंडी यात्रा दि.१३ शनिवार रोजी टाळ मृदंगाच्या गजरात वाजत गाजत ही दिंडी यात्रा शिर्डीकडे मार्गस्थ झाली आहे.बिलोली शहरांसह तालुक्यांतील व शेजारील सिमावर्ती तेलंगाना राज्यात अल्पावधी काळातच नवसाला पावणारे हजारो श्रीसाई भक्तांचे श्रद्धास्थान म्हणून परिचित असलेले विशेष बाब म्हणजे दर गुरुवारी येथे दान शुर साई भक्ताकडुन आरती व महाप्रसादाचा कार्यक्रमांत साईभक्ताची दर्शनासाठी मोठी गर्दी होत असते व भक्त महाप्रसादाचा देखील भक्त लाभ घेत असतात भक्तांच्या नवसाला पावन होणारे हे श्रीसाई बाबांचे मंदिर बिलोली शहरांपासुन जवळच असलेल्या बोधन रोडवर्ती पंधरा वर्षापुर्वी स्थापन झाले असुन या मंदीर ट्रस्टची परंपरा कायम ठेवत यंदाही पायी पालखी दिंडीत जवळ पास ७० ते ८० महिला व पुरुष साई भक्त सहभागी झाले असुन सदरची ही दिंडी बिलोली ते नरसी मार्गे गडगा, लोहा, परळी वैजनाथ, राजोरी, शिरूर कासार, मोहटा, वळदगाव, शनिशिंगनापुर या मार्गानी ४७५ ते ५०० की. मी. चा प्रवास १८ दिवस पार करून ३१ डिसेंबर रोजी शिर्डीच्या पवित्र पावन भुमित पोहचेल व नुतन वर्षांत श्रीसाईबाबांच्या चरणी नतमस्तक होऊन बिलोलीच्या दिशेनी मार्गस्थ होईल. या पालखीचे दि. १३ डिसेंबर शनिवार रोजी टाळ मृदंगाच्या गजरात वाजत गाजत जय..जय काराच्या घोषणांनी निघालेल्या या पायी पालखी दिंडीमध्ये येथील श्री साई मंदिर ट्रस्टचे विश्वस्त किरण देशमुख मंदिर पुजारी शिवकुमार स्वामी शेवाळकर यांच्यासह शेकडो महीला पुरूष साईभक्त सहभागी झाले होते.